## " BEST CANVICTION OF THE MONTH - JULY 2019"

दिनांक **१६/०९/२०१९** रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या हस्ते भरूचा सभाग्रह, सहावा मजला, नविन पोलीस आयुक्त इमारत,पोलीस आयुक्त कार्यालय मुंबई येथे आयोजीत करण्यात आलेल्या गुन्हे परिषदेत बक्षिस वितरण कार्यक्रमात सोबत जोडण्यात आलेल्या माहे **जुलै** —२०१९ या महिन्याचा **" BEST CANVICTION OF THE MONTH "**

| | | |
|---|---|---|
| **०३** | **मांटूगा पोलीस ठाणे परिमंडळ—४** | **गु.र.क्र.३६१/१७, कलम ३७६ (आय) (जे) , ५०६ (२) भांदविस सह कलम ४, ८, १२, १३ पोक्सो सह कलम ६७ (बी) आय.टी.ॲक्ट— २०००** |

**‘‘<u>अल्पवयीन मुलीवर लैगिंक अत्याचार करुन जिवे ठार मारण्याची धमकी देणे</u>’’**

**<u>गुन्हयाची थोडक्यात हकिकत</u>:—** फिर्यादी नामे सौ. मयुरी महेंद्र कदम, हिं/४० वर्षे, व्यवसाय — गृहिणी, रा.ठि. रुम नं. २१८, बिल्डींग नं. ११, म्हाडा कॉलनी, आयमॅक्स टॉकिज जवळ, भक्ती पार्क, वडाळा (पुर्व), मुंबई ३७. मो.नं. ७२०८४१२३९४. यांनी फिर्याद दिली कि, यातील बळीत मुलगी नामे कशिश महेंद्र कदम वय १४ वर्षे हिचा आरोपीत नामे सनी शाम कांबळे याने दोन आठवडे पाठलाग करुन तीला व तीच्या कुटूंबियांना जीवे ठार मारण्याची धमकी देवून तिच्या सोबत सलगी निर्माण केली व दिनांक २७/११/१७ रोजी दुपारी १२.०० वा. ते १६.०० वा. दरम्यान सिध्दीविनायक मंदिर येथे जात असल्याचे सांगून दादर रेल्वे स्टेशन (पुर्व) जवळील श्रीधर रेस्ट हाऊस येथे गप्पा मारण्याच्या बहाण्याने नेले व तिला तेथे बंद खोलीत नेवून जीवे ठार मारण्याच्या धमक्या देवून तिचे नग्नावस्थेत त्याचे स्वत:चे मोबाईलवर फोटो काढले. त्यानंतर तिचेसोबत बळजबरीने शारिरीक संबंध केले म्हणून तक्रार दिल्याने त्यांचा पोउनि विनायक पाटील यांनी सविस्तर जबाब नोंद करुन माटुंगा पोलीस ठाणे गु.र.क्र. ३६१/१७ , कलम ३७६ (आय) (जे), ५०६ (२) भांदविस सह कलम ४,८,१२,१३ बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण अधिनियम सह कलम ६७ (बी) माहीती तंत्रज्ञान अधिनियम २००० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

| | | |
|---|---|---|
| **<u>फिर्यादी</u>** | :— | सौ. मयुरी महेंद्र कदम, हिं./४० वर्षे |
| **<u>बळीत/मयत</u>** | :— | कु. कशीश महेंद्र कदम वय १४ वर्षे |
| **<u>आरोपी अटक व दिनांक</u>** | :— | सनी शाम कांबळे, हिं/१८ वर्षे.<br>०२/१२/२०१७ |
| **निकाल दिनांक** | :— | २९/०७/२०१९ |
| **दोषसिध्दीचा तपशील** | :— | १) कलम ४ पोक्सो कायदा २०१२ अन्वये २० वर्षे कैद व दंड रु. २०,०००/— दंड न भरल्यास दोन महिने.<br>२) कलम ८ पोक्सो २०१२ अन्वये ५ वर्षे व दंड रु १०,०००/— व दंड न भरल्यास एक महिना.<br>३) कलम १२ पोक्सो २०१२ अन्वये ३ वर्षे व दंड रु १०,०००/— व दंड न भरल्यास एक महिना.<br>४) भादवि कलम ५०६ (२) अन्वये ३ वर्षे कैद व दंड रु १०,०००/— व दंड न भरल्यास एक महिना अशी शिक्षा |

| | | |
|---|---|---|
| | | सुनावण्यात आलेली आहे. |

**तपास कौशल्य** :— तत्कालीन मा. पोलीस उप आयुक्त, श्रीमती एन. अंबीका, मा. सहा. पोलीस आयुक्त, श्रीमती अस्मिता भोसले व वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळासाहेब काकड यांनी सदरचा गुन्हा गंभीर स्वरुपाचा असल्याने पोउनि विनायक पाटील, पो.नि. व्हनमाने यांना सदर गुन्हा दाखल करुन तपासाबाबत मार्गदर्शन केले. त्याप्रमाणे पोलीस निरीक्षक विनय पाटणकर, तसेच तपासी अंमलदार पो.ह.क्र. २८०३३/ दशरथ अमृसकर, पो.ना. ००७७९/ सुहास गणपत चवरे यांच्या मदतीने गुन्हयातील साक्षिदार यांचे जबाब नोंद करुन भौतिक, वैद्यकीय, शास्त्रोक्त पुरावे प्राप्त केले.

नमुद गुन्हयामध्ये यातील फिर्यादी यांनी आरोपीत इसमाचा सविस्तर पत्ता दिलेला असल्यामुळे मसपोनि गवळी, पोउपनि पाटील, प्रथम चौकशी पथकाचे पोशिक्र ०८०४१० सोनावणे हे रवाना झाले होते. त्यांना आरोपी इसम त्याचे राहते घरी मिळून आला. त्यास चौकशीकामी ताब्यात घेवून पोलीस ठाण्यास आणले व त्यास विश्वासात घेवून चौकशी केली असता त्याने गुन्हयाची कबूली दिली. त्याचा गुन्हयातील सहभाग निष्पन्न झाल्याने त्यास त्याच्या अटकेची कारणे सांगून रितसर अटक करण्यात आली.

यातील बळीत मुलीची तसेच अटक आरोपीताची मा. वैद्यकीय अधिकारी, सायन हॉस्पीटल, मुंबई येथे वैद्यकीय तपासणी करण्यात आली. तसेच नमुद गुन्हा घडतेवेळी बळीत मुलगी व अटक आरोपी यांनी अंगावर परीधान केलेले कपडे गुन्हयातील अटक आरोपीताने निवेदन दिल्याने दोन पंचांसमक्ष निवेदन पंचनाम्यांतर्गत आरोपीताने दाखविल्याप्रमाणे हस्तगत करण्यात आले होते. तसेच अटक आरोपीताचा मोबाईल फोन जप्त करून तपासकामी ताब्यात घेण्यात आला होता.

गुन्हयातील अटक आरोपीतासह जावून गुन्हयाचे घटनास्थळ असलेले श्रीधर रेस्ट हाउस, कसम मिठा बिल्डींग, पहिला मजला, दादासाहेब फाळके रोड, कैलाश मंदिराजवळ, सेंट्रल रेल्वे दादर (पु), मुंबई १४ येथील आरोपीताने यातील बळीत मुलीवर अतिप्रसंग केलेल्या खोलीचा दोन पंचांसमक्ष पंचनामा करण्यात आला.

नमुद गुन्हयातील बळीत मुलगी नामे कशीश महेंद्र कदम, वय १४ वर्षे व अटक आरोपीत नामे सनी शाम कांबळे यांची सायन रुग्णालय येथे वैद्यकिय तपासणी करण्यात आली असून वैद्यकिय अधिकारी यांनी बळीत मुलीचे पाच सिलबंद टयुबमध्ये वेगवेगळे नमुने दिलेले होते. तसेच आरोपीताची देखील वैद्यकिय तपासणी पुर्ण झालेली असून मा. वैद्यकिय अधिकारी यांनी त्याच्या रक्ताचा नमुना एका सिलबंद टयुबमध्ये दिलेला आहे. सदर सर्व सिलबंद नमुने माटुंगा पोलीस ठाणे जा.क्र. ७५६०/२०१७ अन्वये मा. संचालक, रासायनिक विश्लेषण प्रयोगशाळ, विद्यानगरी कालीना, मुंबई यांना रासायनिक विश्लेषणाकामी पाठविण्यात आले होते. सदर गुन्हयाच्या तपासादरम्यान बळीत मुलीची आई, बहीण, मित्र, तसेच साक्षिदार यांचे जबाब नोंद करण्यात आले आहेत.

बळीत मुलगी व आरोपीताचे केलेल्या वैद्यकीय तपासणीप्रमाणे बळीत मुलीवर जबरी संभोग केल्याबाबतचा समर्थ अहवाल मा. वैद्यकीय अधिकारी, सायन रुग्णालय, मुंबई यांनी सादर केला. तो गुन्हयाचे कागदपत्रात समाविष्ठ करण्यात आला होता. तसेच मा. रासायनिक विश्लेषक यांच्याकडून तपासणीकामी पाठविण्यात आलेले नमुने व सॅमसंग मोबाईल बाबतचा अहवाल प्राप्त करण्यात आला. यातील आरोपीताने गुन्हा केल्यानंतर बळीत मुलीचे नग्नाअवस्थेतील फोटो काढल्याबाबतचे समर्थ अहवाल प्राप्त झाले. आरोपीताविरुध्द रासायानिक

तसेच भौतिक सबळ पुरावे प्राप्त झाल्याने विहीत वेळेत मा. न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले. यातील बळीत मुलीस मनोर्धर्य योजने अंतर्गत रु. २,००,०००/— आर्थिक मदत मिळवून दिलेली आहे.

तरी सदर गुन्हयाचा तपास तत्कालीन मा. पोलीस उप आयुक्त, श्रीमती एन. अंबीका, मा. सहा. पोलीस आयुक्त, श्रीमती अस्मिता भोसले व वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळासाहेब काकड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विनय पाटणकर, पोउपि विनायक पाटील तसेच तपासी अंमलदार पो.ह.क्र. २८०३३/ दशरथ अमृसकर, पो.ना. ००७७९/सुहास गणपत चवरे व पैरवि अधिकारी सपोउनि उदय शेळके तसेच कोर्ट कारकुन पो.ह.क्र. २४६४४/ महेंद्र निकाळजे यांनी यातील साक्षिदार व साक्षपुरावे वेळोवेळी साक्षकामी मा.सत्र न्यायालय मुंबई यांचे न्यायालयात हजर केले. त्यामुळे आरोपीतास शिक्षा मिळवून देऊन बळीत मुलीस व तिच्या कुटूंबियास न्याय मिळवून दिला. मा. न्यायालयाने सुनावलेल्या वर नमूद शिक्षेमुळे समाजातील अशा प्रकारचे क्रुर कृत्ये करणाऱ्या वाईट प्रवृत्तींना वचक बसवून असे कृत्ये करण्यास ते पुन्हा धजावणार नाहीत. तसेच अशा प्रकारचे अमानवीय कृत्य करणाऱ्या आरोपीस शिक्षेपर्यंत पोहचविण्याची उल्लेखनिय कामगिरी ही पोलीस तपास व त्यानंतरच्या न्यायालयीन कामकाजाच्या वेळी वर नमूद पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी केली आहे. तसेच जनमानसामध्ये मुंबई पोलीस दलाची प्रतिमा उंचावून, समाजाचा न्यायव्यवस्थेवरचा विश्वास अबाधित ठेवण्यात यश प्राप्त केले आहे.

अशा प्रकारे आरे पोलीस ठाण्याच्या नमूद पथकाने अथक परिश्रम घेवून नमूद गुन्हयात आरोपीस दोषसिध्दी मिळावी म्हणून प्रयत्न केले.

सदरचा संवेदनशील गुन्हा उघड करुन दोषसिध्द झाल्याने सदर गुन्हयातील अटक आरोपी नामे सनी शाम कांबळे, हिं/१८ वर्षे. यास सत्र न्यायालयाने खालील प्रमाणे शिक्षा दिलेली आहे.

१) कलम ४ पोक्सो कायदा २०१२ अन्वये २० वर्षे कैद व दंड रु. २०,०००/— दंड न भरल्यास दोन महिने.
२) कलम ८ पोक्सो २०१२ अन्वये ५ वर्षे व दंड रु १०,०००/— व दंड न भरल्यास एक महिना.
३) कलम १२ पोक्सो २०१२ अन्वये ३ वर्षे व दंड रु १०,०००/— व दंड न भरल्यास एक महिना.
४) भादवि कलम ५०६ (२) अन्वये ३ वर्षे कैद व दंड रु १०,०००/— व दंड न भरल्यास एक महिना अशी शिक्षा सुनावण्यात आलेली आहे.

मा. पोलीस आयुक्तांनी माहे जुलै—२०१९ चे बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ अर्थात उत्कुष्ठ गुन्हे दोषसिध्दी या पारितोषिकाने खालील अधिकारी व कर्मचारी यांना सन्मानित केले आहे.

- **मांटुगा पोलीस ठाणे, मुंबई तपास पथकातील अधिकारी व अंमलदाराचे नावे खालीलप्रमाणे.**

| अ.क्र. | हुद्दा व बक्कल क्र. | नाव |
|---|---|---|
| १ | पोलीस निरीक्षक | श्री. विनय गुलाबराव पाटणकर |
| २ | पोलीस उप निरीक्षक | श्री. विनायक गोपाळ पाटील |
| ३ | पो.ह.क्र. २८०३३ | श्री. दशरथ तुकाराम अमृसकर |
| ४ | पो.ना.क्र.००७७९ | श्री. सुहास गणपत चवरे |
| ५ | सहा. पोउनि क्र. २४९४५ | श्री. उदय काशिराम शेळके |
| ६ | पो.ह.क्र. २४६४४ | श्री. महेंद्र गणपत निकाळजे |